# प्रामाणिक अब्राहम



लेखक : एडिथ कुनहार्ट


चित्रे : मालका झेल्दीस

# प्रामाणिक अब्राहम



लेखक : एडिथ कुनहार्ट

चित्रे : मालका झेल्दीस




*अब्राहम लिंकन* यांचा जन्म कैंटकी राज्यात एका लाकडी घरात झाला. त्याचे आईवडील, *थॉमस* आणि *नॅन्सी लिंकन,* गरीब होते. त्याचे वडील सुतारकाम आणि शेतीकाम करत. त्याची आई त्यांना शेतकामात मदत करत असे. त्याच्या आईवडिलांना लिहिता-वाचता येत नसे.



अब्राहमला *सारा* नावाची एक मोठी बहीण होती. तो शाळेत जाण्याच्या वयाचा झाला तेव्हा तो आणि सारा दोन मैल पायी चालत एका खोलीच्या शाळेत जाऊ लागले. शाळेच्या सर्व इयत्तेतील मुले त्या एकाच खोलीत बसत. अब्राहम लिंकन यांनी शाळेचे शिक्षण एकच वर्ष घेतले. पण तो शिकायला आतुर असल्यामुळे तो स्वतःच शिकू लागला.




अब्राहम सात वर्षांचा झाला तेव्हा त्याचे कुटुंब शंभर मैल दूर इंडियाना राज्यात राहायला गेले. त्यांनी त्यांचे सर्व सामान दोन घोड्यांवर लादले आणि जंगलातून प्रवास केला. त्या जंगलात लांडगे आणि अस्वल यांचा वावर होता.



इंडियानात पहिल्या वर्षी, अब्राहमने एक लाकडाचे घर बांधण्यात वडिलांना मदत केली. या घरात एकच खोली होती आणि त्याच्या फरशा मातीच्या होत्या. घर तयार झाल्यावर, अब्राहम पोटमाळ्यावर झोपू लागला. सुकलेल्या पानांची रास हाच त्याचा बिछाना होता.






दोन वर्षांनंतर, अब्राहमच्या आईचा मृत्यू झाला. अब्राहम त्याचा चुलत भाऊ *डेनिस*शी खेळत असे. डेनिस अब्राहमच्या घरी राहायला आला होता. पण आता काहीही पहिल्यासारखे वाटत नव्हते.

आणखी एक वर्ष निघून गेले आणि थॉमस लिंकन हे अब्राहम, सारा आणि डेनिस यांना एकटे सोडून केंटकीला परतले.



अनेक आठवड्यांनंतर, थॉमस एका नव्या पत्नीसोबत परतला. तिचे नावसुद्धा सारा होते, पण थॉमस तिला *सॅली* म्हणत असे. ती तिची तीन मुले आणि फर्निचर घेऊन आली.

अब्राहमला सॅली आवडली आणि तिलासुद्धा तो आवडत असे. तिने थॉमसला सांगून घरात लाकडी फरशा बसवल्या आणि गळणारे छतही दुरुस्त करून घेतले. आता त्याच्या खोलीत आठ माणसे राहात होती.



रात्री सॅली अब्राहमला त्याच्या अभ्यासात मदत करत असे. तो आग जाळून त्याच्या प्रकाशात वाचत असे. तो कुणाकडूनतरी पुस्तके आणि वृत्तपत्रे उधारीवर आणत असे. त्याने जॉर्ज वॉशिंग्टनबद्दल वाचले. त्याने बायबल वाचले. त्याने कविता लिहिल्या. तो शिकत राहिला.




अब्राहम आता उंच आणि बळकट झाला. त्याचे वडील त्याला दुसऱ्यांच्या शेतावर मजूरी करायला पाठवत. त्याला दिवसाला 25 सेंट कमाई होत असे. तो झाडे कापून इंधनासाठी लाकडे मिळवत असे आणि ओंडके कापून घराचे कुंपण बनवत असे. तो एक कार्यक्षम मजूर होता. कधीकधी तो कापलेल्या झाडाच्या फांदीवर बसून लोकांना मजेशीर गोष्टी आणि विनोद सांगत असे. लोक आवडीने त्याची बडबड ऐकत असत.




अब्राहमच्या खिशात किंवा हातात नेहमी एखादे पुस्तक असे. शेत नांगरत असतानाही त्याच्यासोबत एखादे पुस्तक असे. मक्याच्या शेताची निम्मीअधिक नांगरणी झाल्यावर, त्याचा घोडा आराम करत असे, तेव्हा तो पुस्तक वाचत बसे.




तो एकोणीस वर्षांचा झाला तेव्हा त्याची उंची सहा फूट चार इंच होती. त्याचे वजन दोनशे पौंडापेक्षा जास्त होते. आणि तो एक ताकदवान कुस्तीपटू आणि पट्टीचा पोहोणारा होता.
अब्राहम मिसिसिपी नदीत नाव चालवण्याचे काम करत असे. या नावेतून डुक्कर आणि मक्याची पिके बाजारात नेत असत.




नाव नदीमार्गे *न्यू ऑर्लियन्स* शहरात जात असे. तिथे अब्राहमने गुलाम पाहिले. या काळ्या गुलामांना ते करत असलेल्या कामाचे वेतन मिळत नसे. गोरे लोक त्यांचे मालक होते आणि ते गुलामांना विकूही शकत. अब्राहमला ही गुलामगिरीची प्रथा आवडत नसे.




लवकरच, अब्राहम न्यू ऑर्लियन्सहून परतला. मग थॉमस लिंकन आपले कुटुंब घेऊन इलिनॉय राज्यात राहायला गेला. थोड्याच काळात अब्राहमने घर सोडले. तो इलिनॉयमधील *न्यू सेलम* शहरात राहायला गेला. तिथे तो एका दुकानात काम करत असे. काही काळाने अब्राहम गोष्टी सांगतो म्हणून गोरे लोक त्याच्या दुकानात गर्दी करू लागले.





लोक त्याला *एब* किंवा *प्रामाणिक एब* म्हणू लागले. एकदा एका बाईने त्याला चुकून सव्वासहा सेंट पैसे जास्त दिले. तिला शोधत तो तीन मैल चालला आणि तिचे पैसे तिला परत केले.

एबने न्यू सेलममध्ये अनेक नोकऱ्या केल्या. त्याने पोस्टमास्टरचे काम केले, टपालांचे वाटप केले आणि जमिनींचे सर्वेक्षणही केले.




एबला कोर्टात जाऊन वकिलांच्या तर्कशुद्ध चर्चा ऐकायला आवडत असे. अनेक लोक त्याचा सल्ला घेण्यास येत. त्याने वकील बनायचे असे मनोमन ठरवले. त्यासाठी त्याने खूप अभ्यास केला. त्याने रात्री जागून काम केले आणि तीन वर्षांत तो एक वकील बनला.



मग एब इलिनॉयची राजधानी स्प्रिंगफिल्ड येथे गेला. तिथे त्याची भेट *मेरी टॉड*शी झाली. त्यावेळी तिचे वय 21 वर्षे होते. एब 30 वर्षांचा होता. मेरी लोकप्रिय होती. तिला नृत्य आणि फ्रेंच भाषा अवगत होत्या. एब आणि मेरी यांनी लग्न केले.




एब एक उंच रेशमी टोपी घालत असे. त्यात तो बिले, चिठ्ठ्या आणि कागदपत्रे ठेवत असे. काहीवेळा, तो टोपी डोक्यावरून काढत असे तेव्हा हे कागद खाली पडत. एबचे कार्यालय स्प्रिंगफिल्डमध्ये होते. पण तो लोकांना कायदेशीर मदत करण्यास छोट्या शहरांमध्येही जात असे. त्याने बरेच मित्र जमवले. मग त्याने अमेरिकी संसदेची निवडणूक लढवली आणि तो विजयी झाला.



काही वर्षांनंतर, एबने अमेरिकी सेनेटची निवडणूक लढवायचे ठरवले. त्याचा प्रतिस्पर्धी होता, *स्टिफन ए. डग्लस.* डग्लसला गुलामगिरी प्रथा मान्य होती. लिंकनला ही प्रथा बंद करायची होती. लिंकन आणि डग्लस यांनी संपूर्ण इलिनॉय पिंजून काढले आणि या विषयावर लोकांशी वादविवाद केला. मतदान झाले, तेव्हा डग्लस विजयी झाला. पण वादविवादांमुळे लिंकनला बरीच प्रसिद्धी मिळाली.




दोन वर्षांनंतर, डग्लस आणि लिंकन पुन्हा एकमेकांविरुद्ध निवडणुकीला उभे राहिले. ही निवडणूक अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी होती आणि यात लिंकन विजयी झाला. एब, मेरी आणि त्यांची तीन मुले वॉशिंग्टन डी. सी. येथील व्हाईट हाऊसमध्ये राहायला गेले.



मुलांना ते घर खूप आवडले. ते घराच्या गच्चीत खेळत, त्याच्या अंगणातील हिरवळीवर घोडेस्वारी करत, तेथील बकऱ्यांचा पाठलाग करत खोल्यांमधून फिरत.



अब्राहम लिंकन अमेरिकेचे अध्यक्ष बनल्यावर दोनच आठवड्यात नागरी युद्ध सुरू झाले. या युद्धात एकीकडे उत्तरेकडील राज्यांमध्ये राहाणारे लोक होते, ज्यांतील बहुसंख्य लोकांना गुलामगिरी प्रथा समाप्त करायची होती आणि दुसरीकडे दक्षिणेकडील राज्यांमध्ये राहाणारे लोक होते, ज्यांतील बहुसंख्य लोकांना गुलामगिरी प्रथा सुरू ठेवायची होती.



दोन वर्षे निघून गेली. युद्धात हजारो सैनिक मारले गेले. दक्षिणेकडील राज्ये जिंकण्याची चिन्हे दिसू लागली. यात भर म्हणजे, अध्यक्षांचा बारा वर्षांचा मुलगा *विली*, याचा मृत्यू झाला. अशा कठीण समयी, लिंकनने गुलामांच्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यावर हस्ताक्षर केले. गुलामगिरी प्रथा समाप्त होण्यात हे एक महत्त्वाचे पाऊल होते. दोन वर्षांनंतर, घटनेच्या तेराव्या दुरुस्तीन्वये, अमेरिकेतून गुलामगिरी प्रथा समूळ नष्ट करण्यात आली.



तरीही युद्ध सुरूच राहिले. पेनसिल्व्हेनिया राज्यातील *गेटीसबर्ग* शहरात एक घनघोर युद्ध झाले. त्यात हजारो सैनिक ठार झाले.



पाच महिन्यांनंतर, अध्यक्ष लिंकन युद्धभूमीवर गेले आणि त्यांनी मृत सैनिकांसाठी एक कबरस्थान लोकार्पित केले. तिथे त्यांनी एक भाषण केले, ते आज *गेटीसबर्ग भाषण* म्हणून ओळखले जाते. हे भाषण फक्त दोन मिनिटांचे होते. हे भाषण अमेरिकेच्या इतिहासातील सर्वात प्रसिद्ध भाषणांमध्ये गणले जाते. ते म्हणाले की या युद्धात शहीद झालेल्या वीर सैनिकांना जनता कधीच विसरणार नाही आणि जनतेने निवडलेले, जनतेसाठी काम करणारे सरकार पृथ्वीवर कायम राहील.



हे युद्ध चार वर्षांपेक्षा जास्त चालले. “मला आयुष्यात एवढा आनंद कधीच झाला नाही,” अध्यक्ष म्हणाले.


पाच दिवसांनी अध्यक्ष आणि त्यांची पत्नी नाटक पाहायला गेले. नाटकादरम्यान, एका व्यक्तिने मागून अध्यक्षांच्या डोक्यात गोळी झाडली. अध्यक्षांनी गुलामांना स्वतंत्र केले याचा राग त्या व्यक्तिच्या मनात होता. त्याने झाडलेली गोळी अध्यक्षांच्या मेंदूत घुसली.



रात्रभर अध्यक्ष लिंकन बेशुद्धावस्थेत होते. सकाळी त्यांचे निधन झाले.

त्यांचे शरीर एका शवपेटीत ठेवून ती व्हाईट हाऊसमध्ये ठेवण्यात आली. असंख्य लोकांनी शोक व्यक्त केला.

# गेटिसबर्गचे भाषण



अध्यक्ष लिंकन यांचे पार्थिव रेल्वेने पुन्हा इलिनॉय येथे आणण्यात आले. रेल्वेच्या दोन्ही बाजुंना उभे असलेल्या हजारो लोकांनी त्यांना अंतिम निरोप दिला. रेल्वेच्या प्रवासात दहा वेगवेगळ्या शहरांमध्ये त्यांचे अंतिम संस्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आले. शेवटी, रेल्वे स्प्रिंगफिल्ड येथे पोहोचली. तिथे त्यांचे पार्थिव दफन करण्यात आले. प्रामाणिक एब शेवटी पुन्हा आपल्या घरी पोहोचला.

सत्त्याऐंशी वर्षांआधी आमच्या वाडवडिलांनी या खंडावर एका नव्या राष्ट्राची स्थापना केली, जी व्यक्तिगत स्वातंत्र्य या संकल्पनेवर आधारीत होती आणि सर्व मनुष्य एकसमान आहेत, या सिद्धांताला समर्पित होती.

सध्या आपण एका मोठ्या नागरी युद्धात गुंतलो आहोत. ही आपली परीक्षा आहे. अशा संकल्पनेवर बनलेला एखादा देश दीर्घ काळ टिकतो की नाही, याची चाचणी यातून होणार आहे. आज आपण या महान युद्धाच्या रणभूमीवर ही परीक्षा देत आहोत. आज या रणभूमीच्या छोट्याशा भागावर आपण शहिदांना श्रद्धांजली वाहात आहोत. त्यांनी या राष्ट्रासाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले आहे. त्यांना हा सन्मान देणे, हे आपले कर्तव्य आहे. पण खरं पाहायला गेलं तर, या धरतीला पवित्र आणि सन्मानित करणारे आपण नसून ते लोक आहेत, ज्यांनी या धरतीवर युद्ध केलं आहे आणि ज्यांतील कित्येकांनी आपले प्राण वेचले आहेत. आज आपण जे काही इथे बोलतोय, त्याची जगात कदाचित नोंदही होणार नाही किंवा ते कुणाच्या स्मरणातही राहाणार नाही. पण या वीरांनी केलेला त्याग जग कधीच विसरू शकणार नाही. या महान योद्ध्यांनी ज्या ध्येयासाठी आपले प्राण दिले, ते पूर्ण समर्पण करून प्राप्त करणे, ही आपली जबाबदारी आहे. आपल्याला हा पण करायचा आहे की या वीरांचे बलिदान व्यर्थ न जावो आणि ईश्वरी कृपेने या राष्ट्राचा नवा जन्म होवो. लोकांसाठी समर्पित आणि त्यांच्याचद्वारे संचालित हे शासन या धरतीवर निश्चितपणे कायम राहील.

# अब्राहम लिंकन यांचा जीवनक्रम

| | |
|---|---|
| 12 फेब्रुवारी 1809 | केंटकी राज्यातील हार्डिन काउंटी येथे जन्म. |
| नोव्हेंबर 1816 | कुटुंब केंटकीहून इंडियाना येथे राहायला गेले. |
| 5 ऑक्टोबर 1818 | आईचे इंडियानातील स्पेन्सर काउंटी येथे निधन. |
| 2 डिसेंबर 1819 | केंटकीतील एलिझाबेथ टाउन येथे वडिलांनी सारा जॉन्स्टनशी लग्न केले. |
| 1 मार्च 1830 | कुटुंब इंडियानाहून इलिनॉय येथे राहायला गेले. |
| जुलै 1830 | इलिनॉयमधील न्यू सेलम येथे स्थलांतर. |
| 21 एप्रिल 1832 | ब्लॅक हॉक युद्धात कॅप्टन म्हणून निवड. |
| 4 ऑगस्ट 1834 | इलिनॉय राज्य विधानसभेत निवड. |
| 12 एप्रिल 1837 | इलिनॉय येथील स्प्रिंगफ़ील्डमध्ये वकिली सुरू. |
| 4 नोव्हेंबर 1842 | मेरी ॲन टॉडशी लग्न. |
| ऑगस्ट 1842 | अमेरिकी संसदेत निवड. |
| 2 नोव्हेंबर 1858 | अमेरिकी सीनेटच्या निवडणुकीत स्टिफन डग्लसकडून पराभूत. |
| 18 मे 1860 | रिपब्लिकन पक्षातर्फे अध्यक्षपदासाठी नामनिर्देशित. |
| 6 नोव्हेंबर 1860 | अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून निवड. |
| 12 एप्रिल 1861 | अमेरिकेत गृहयुद्धास सुरुवात. |
| 1 जानेवारी 1863 | गुलामांच्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यावर सही केली. |
| 19 नोव्हेंबर 1863 | गेटिसबर्ग येथे भाषण. |
| 8 नोव्हेंबर 1864 | अध्यक्षपदासाठी दुसऱ्यांदा निवड. |
| 9 एप्रिल 1865 | गृह युद्ध समाप्त झाले. |
| 14 एप्रिल 1865 | जॉन विल्क्स बूथ याने वॉशिंग्टन डी. सी. च्या फोर्ड थिएटरमध्ये गोळी झाडली. |
| 15 एप्रिल 1865 | वयाच्या 56 व्या वर्षी मृत्यू. |
| 4 मे 1865 | इलिनॉयमधील स्प्रिंगफिल्ड शहरात अंतिम संस्कार. |